महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Website: maharashatracrimetimes.com www.facebook.com/maharashtra.c.times Info@maharashtracrimetimes.com Twitter- @MHCrimeTimes Whatsapp -9803386748

मूल्य २/- रुपये

● वर्ष : १२ ● अंक: १५ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार १३ जुलै २०२१ ते सोमवार १९ जुलै २०२१ ● RNI. REG. NO. 105858/2010 ● POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2020-2022

## सुविचार

फुल कितीही सुंदर असू द्या कौतुक त्याच्या सुगंधाचे होते... तसेच माणूस कितीही मोठा झाला तरी कौतुक त्याच्या गुणांचे होते.

# माझ्यावर पाळत ठेवली जातेय



## नाना पटोलेंचा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, अजित पवारांवर गंभीर आरोप

**मुंबई (योगेश होळंब)-** मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्यावर पाळत ठेवल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचेप्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. यामुळे महाविकास आघाडीमध्येखळबळ उडाली असून राष्ट्रवादीकडून यावर प्रतिक्रिया आली आहे. आपला ब्राउझिंगचा अनुभव अधिक चांगला व्हावा, तुम्हाला तुमच्या आवडीच्या मजकुराची शिफारस करता यावी, यासाठी ही वेबसाईट कुकी किंवा तत्सम तंत्रज्ञान वापरते. आमची वेबसाईट वापरणंसुरू ठेवून आपण आमच्या गोपनीयता धोरणाला आणि कुकी धोरणाला सहमती देता. नाना पटोले यांनी लोणावळ्यामध्येकार्यकर्त्यां च्या एका सभेवेळी हेवक्तव्य केले आहे. महाराष्ट्रात काँग्रेस उभी राहत आहे. आयबीचा, पोलिसांचा रिपोर्ट रोजच्या रोज सकाळी ९ वाजता मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांच्या बंगल्यावर नेऊन दिला जात आहे. आताही मी कुठे आहे, राज्यात कुठे कुठे काय सुरु आहे, कुठे आंदोलन होत आहेयाची माहिती त्यांना पोहोचवली जात आहे. मी स्वबळाचा नारा दिल्यानेत्यांच्या पायाखालची वाळू सरकू लागल्यानेत्यांनी आपल्यावर पाळत ठेवल्याचा आरोप नाना पटोले यांनी केला आहे.

### माझ्या वक्तव्याचा विपर्यास, मनगढत कहाण्या रचून सरकारमध्ये फूट पाडण्याचा डाव

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री आपल्यावर पाळत ठेवून आहेत, असं विधान करून काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी खळबळ उडवून दिली. त्यानंतर त्यांनी आता आपल्या वक्तव्याचा विपर्यास केल्याचा दावा केला आहे. माझ्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात आला. मनगढत कहाण्या रचून आघाडी सरकारमध्ये फूट पडण्याचा डाव सुरू आहे. पण विरोधकांचा हा डाव यशस्वी होणार नाही, अशा शब्दात नाना पटोले यांनी भाजपवर पलटवार केला.

## थोडक्यात

### भोसरी जमीन घोटाळा: एकनाथ खडसेंच्या जावयाला १५ जुलैपर्यंत ED कोठडी

**मुंबई (सम्यक कासारे):** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई गिरीश चौधरी यांना १५ जुलैपर्यंत ईडी कोठडी सुनावण्यात आली आहे. मुंबईतील पीएमएलए कोर्टानं तीन दिवसांची ईडी कोठडी सुनावली आहे. मनी लाँड्रींग प्रकरणात ही कोठडी



सुनावण्यात आली आहे. ईडीने ९ दिवसांची कोठडी मागितली होती. मात्र कोर्टाने केवळ तीन दिवसांची कोठडी दिली. पुण्यातील भोसरी येथील जमीन खरेदी प्रकरणात मनी लाँड्रीग झाल्याचा ईडीचा आरोप आहे. पाच दिवसांपूर्वी ईडीने खडसेंचे जावई गिरीश चौधरी यांना अटक केल्याने खळबळ उडाली होती. माजी मंत्री एकनाथराव खडसे यांच्या पत्नी मंदाताई खडसे, गिरीश चौधरी यांच्या नावाने भोसरी येथे एमआयडीसी जागा खरेदी केल्याचे प्रकरण गाजले होते. या प्रकरणी खडसेंनी मंत्रीपदाचा गैरवापर करून कमी किंमतीत ही जागा खरेदी केल्याचा आरोप त्यांच्यावर झाला होता.

### 'कोरोना हे थोतांड आहे'; संभाजी भिडेंचं पुन्हा अजब विधान

**मुंबई (विशाल कारंडे)-** शिवप्रतिष्ठान हिंदूस्तान या संघटनेचे प्रमुख संभाजी भिडे आपल्या वादग्रस्त वक्तव्यांसाठी प्रसिद्ध आहेत. येनकेन कारणाने ते



नेहमीच चर्चेत असतात. त्यांनी अलिकडेच कोरोना संदर्भात केलेली वक्तव्ये चांगलीच वादग्रस्त ठरली आहेत. संभाजी भिडे यांनी आता आपल्या या वादग्रस्त वक्तव्यांच्या मालिकेत आणखी भर घातली आहे. त्यांनी म्हटलंय की, कोरोना म्हणजे थोतांड आहे. आणि हे शासन हा थोंताडपणा वाढवत आहे. लॉकडाऊन लावल्यामुळेच अधिक नुकसान होत आहे. सगळं मोकळं करु देत, काहीही देशात वाटोळं होणार नाही. कोरोनाच्या लॉकडाऊनमुळे जेवढं नुकसान झालंय, त्याच्या एक अब्जांश देखील वाटोळं होणार नाही. सरकार लॉकडाऊन लावतंय ते १०० टक्के चूकच आहे. पुढे त्यांनी कोरोनामुळे मंदीर बंद असण्याच्या मुद्यावर म्हटलंय की, देव सध्या कुलूपबंद आहेत. गावोगावचे लोक कुलूप तोडून टाकू.

## 'सर्वसामान्यांना लोकल प्रवासाची परवानगी द्या, नाहीतर पाच हजार प्रवास भत्ता द्या'

**मुंबई (विशाल पाटील)-** करोनामुळे मुंबईकरांना निर्बंधांबरोबरच प्रवास करतानाही हाल सोसावे लागत आहे. दुसऱ्या लाटेचा उद्रेक झाल्यानंतर लोकलमधून प्रवास करण्यास सर्वसामान्यांना बंदी घालण्यात आली होती. मात्र, दुसरी लाट ओसरत असून, नागरिकांनाकडून लोकल प्रवासास परवानगी देण्याची मागणी केली जात आहे. असं असतानाही अद्याप बंदी हटवण्याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. मुंबईकरांना होत असलेल्या त्रासाकडे लक्ष वेधत भाजपाने राज्य सरकारकडे मोठी मागणी केली आहे. 'राज्य सरकारने मुंबई व उपनगरातील सर्वसामान्यांना लोकल प्रवासाची तत्काळ परवानगी द्यावी, अन्यथा सर्वसामान्य माणसाला प्रवास भत्त्यापोटी दरमहा ५ हजार रुपये द्यावेत', अशी मागणी भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या



पत्रकार परिषदेत उपाध्ये बोलत होते. उपाध्ये म्हणाले,'राज्य सरकारनं गेली दीड वर्षे सर्वसामान्य जनतेसाठी उपनगरी रेल्वे सेवा बंद ठेवली आहे. त्यामुळे नोकरदार तसेच रोजगारासाठी बाहेर पडाव्या लागणाऱ्या कष्टकरी जनतेची प्रचंड गैरसोय होत आहे. या वर्गाला प्रवासापोटी मोठा भुर्दंड सहन करावा लागत आहे. अन्य वाहनांनी प्रवास करण्यासाठी भरमसाठ खर्च तर होतो, त्याचबरोबर वेळेचाही अपव्यय होतो. करोनामुळे उत्पन्न घटलेल्या वर्गाचे आर्थिक कंबरडे मोडले आहे.

## महाराष्ट्रासह पाच राज्यांत करोना रुग्णसंख्येमध्ये वाढ; केंद्राने पाठवली आरोग्य पथके

**मुंबई (राजेश गायकवाड)-** भारतात रविवारी ३७ हजार १५४ नव्या करोनाबाधितांची नोंद झाली आहे. देशातील एकूण बाधितांची संख्या आता वाढून ३ कोटी ८ लाख ७४ हजार ३७६ झाली आहे. त्यापैकी उपचार घेणाऱ्यांची संख्या ही रूग्णांची संख्या १.४६ टक्के आहे. सध्या भारतात ४ लाख ५० हजार ८९९ सक्रिय रुग्ण आहेत. तर देशात अद्याप अशी पाच राज्ये अशी आहेत जिथे सर्वात जास्त रुग्ण आढळून येत आहेत. केंद्र सरकारने याबाबत चिंता व्यक्त करत या राज्यांमध्ये केंद्रीय आरोग्य पथक पाठवण्यात आले आहेत.

केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती प्रवीण पवार म्हणाल्या की, करोना रुग्ण वाढत असलेल्या राज्यांमध्ये केंद्र सरकारने यापूर्वीच आपले पथक पाठविले आहेत. ज्या राज्यांमध्ये करोना बाधितांमध्ये घट होत नाही आहे त्यात महाराष्ट्र, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश यांचा समावेश आहे. महाराष्ट्रात अद्याप परिस्थिती नियंत्रणात आली नसल्याचं चित्र आहे. राज्यातील आकडेवारीने पुन्हा एकदा प्रशासनाची चिंता वाढवली आहे. जुलै महिन्याच्या सुरुवातीला पहिल्या १० दिवसांत महाराष्ट्र आणि केरळमध्ये गेल्या १६ महिन्यातील सर्वाधिक रुग्णवाढ पहायला मिळाली आहे. महाराष्ट्रात फक्त गेल्या १० दिवसांत तब्बल ७९ हजार ५९५ नवे रुग्ण आढळले आहेत. कोल्हापूर, सातारा, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पुणे (ग्रामीण) आणि सांगली ही या जिल्ह्यांमध्ये



करोना संसर्गाचे प्रमाण जास्त आहे. महाराष्ट्र आणि केरळ देशातील एकूण रुग्णसंख्येत सर्वाधिक वाटा असणारी राज्ये आहेत. देशातील एकूण रुग्णसंख्येत महाराष्ट्र आणि केरळचा ५३ टक्के वाटा आहे.

रविवारी एकट्या केरळमध्ये करोनाची १२ हजार २२० नवीन रुग्ण समोर आले आहेत. राज्यात आतापर्यंत राज्यात ३० लाख ६५ हजार ३३६ करोना बाधितांची नोंद झाली असून यामुळे आतापर्यंत १४ किलकिले ५८६ लोकांचा बळी घेतला आहे. केरळमध्ये करोना व्यतिरिक्त झिका विषाणू देखील पसरू लागला आहे.

## शाळांच्या फी संदर्भात अध्यादेश काढण्याच्या तयारीत राज्य सरकार

**मुंबई (जसबीरकौर भामरा)-** राज्याच्या शिक्षण विभागाला खाजगी शाळांच्या फीचा मुद्दा आणि यामुळे कोरोना काळात पालकांना होणारा मनस्ताप यावर अनेक तक्रारी मिळत आहेत. फी संदर्भात वारंवार येणाऱ्या तक्रारी पाहता राज्य सरकार लवकरच या संदर्भात अध्यादेश काढण्याच्या तयारीत आहे. फी संदर्भात अध्यादेश काढल्यास राज्यातील फी बाबतचा तिढा सुटण्यास मदत होईल व पालकांना सुद्धा त्यामुळे फीच्या मुद्यावर दिलासा मिळणार असल्याच बोलले



जात आहे. राज्यात शाळेची फी वाढ, शाळांची मनमानी, फी न भरल्यामुळे ऑनलाईन शाळेतून विद्यार्थ्यांना काढणे आणि या सगळ्यावर पालकांची आंदोलने, पालकांच्या वारंवार तक्रारी हे सगळे पाहता राज्य सरकार या संदर्भात अध्यादेश काढण्याच्या तयारीत आहे. राज्य सरकारने महाराष्ट्र शैक्षणिक संस्था शुल्क विनियमन अधिनियम कायद्यात (फी रेग्युलेशन ॲक्ट) काही बदल करून अध्यदेश काढण्याचा विचार केला आहे. पुढील मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर चर्चा सुद्धा केली जाऊ शकते. हा अध्यादेश फी रेग्युलेशन ॲक्टमध्ये काही बदल करून काढण्याची तयारी जरी राज्य सरकारची असली तरी या प्रस्तावित अध्यादेशामध्ये सरकारला फी आकाराने किंवा माफ करण्याचे अधिकार असणार की नाही हे अद्याप स्पष्ट नाही.

## निर्बंध पूर्णतः उठवा, किंवा कडक लॉकडाऊन करा; आरोग्यमंत्र्यांची मुख्यमंत्र्यांना विनंती

**मुंबई (दिपेश गोरिवले)-** निर्बंध पूर्णतः शिथिल करण्यात न आल्यामुळे सर्वसामान्य त्रस्त आहेत. त्यामुळे एक तर हे निर्बंध पूर्णतः काढून सर्वसामान्यांना दिलासा द्यावा किंवा पूर्ण आणि कडक लॉकडाऊन करावे, अशी विनंती आपण मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना केली असल्याची माहिती आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिली. सर्वसामान्यांकडून होत असलेल्या या मागणीकडे राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे लक्ष वेधले आहे. जालना येथे पत्रकारांशी बोलताना त्यांनी याविषयी माहिती दिली. देशात आणि महाराष्ट्रात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचा प्रभाव अजूनही आहे. राज्यात पश्चिम महाराष्ट्रात कोरोनाचा उद्रेक कायम असला, तरी राज्याच्या इतर भागांत कोरोना रुग्णसंख्या आटोक्यात आली आहे. मात्र तरीही निर्बंध पूर्णतः शिथिल करण्यात न



आल्यामुळे सर्वसामान्य त्रस्त आहेत असे राजेश टोपे म्हणाले. राज्यात शाळा सुरू करण्यासाठी शालेय शिक्षण विभाग तयारी करत असले तरी शाळा सुरू करू नये. अद्याप लहान मुलांचे लसीकरण झाले नाही. अशातच तिसरी लाटही तोंडावर आहे. लहान मुलांना कोरोनाचा प्रादुर्भावाचा धोका सर्वाधिक आहे. त्यामुळे शाळा सुरू करण्यास अनुकूल नसल्याचे राजेश टोपे यांनी सांगितले. सध्या राज्यात अनेक ठिकाणी लसींचा तुटवडा जाणवत आहे. यासंबंधी ठरावही सरकारने केला आहे. विधिमंडळात ठराव करून तो केंद्र सरकारला पाठवला असून, लवकरच आपण नवनियुक्त केंद्रीय आरोग्यमंत्र्यांची भेट घेणार आहे, अशी माहितीही राजेश टोपे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून राज्यात प्रवेश करताना बाहेरून येणाऱ्या नागरिकांना ४८ तासांची मुदत असलेला कोरोनाचा निगेटिव्ह अहवाल अनिवार्य असणार आहे.

## दुपारी चारनंतर हॉटेल्स, दुकाने सुरु राहता कामा नये; पोलीस सहआयुक्तांचे सक्त आदेश

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** कोविड-१९ च्या अनुषंगाने लागू असलेल्या निर्बंधांची काटेकोरपणे अंमलबजावणी झालीच पाहिजे. दुपारी चार वाजल्यानंतर आस्थापना बंद झालीच पाहिजे. याची सर्वांनी कटाक्षाने नोंद घेऊन कार्यवाही करावी, असे आदेश सहआयुक्त विश्वास नांगरे-पाटील यांनी पोलीस दलाला दिले आहेत. शिवाय नागरिकांनीदेखील सहकार्य करावे, असे आवाहनदेखील त्यांनी केले आहे. कोरोनाचा संसर्ग वाढू नये यासाठी राज्यात निर्बंध घालण्यात आले आहेत. असे असले तरी दुपारी चारनंतर काही दुकाने, हॉटेल्स उघडी राहत असल्याचे सर्रास दिसून येते. हे अत्यंत चुकीचे असून यामुळे पोलिसांची प्रतिमा जनमानसात मलीन होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे सर्व पोलीस ठाण्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी याची गंभीर दखल घेऊन दुपारी चारनंतर दुकाने, हॉटेल्स सुरू राहणार नाही याची काळजी घ्यावी. आपल्या कार्यक्षेत्रात अशा स्वरूपातले



प्रकार होणार नाहीत याची आपण स्वतः खात्री करावी. तसेच लागू असलेल्या निर्बंधांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी असे आदेश पोलिसांनी देण्यात आले आहेत. तसेच नागरिक आणि दुकान मालकांनीदेखील निर्बंधांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहनदेखील नांगरे-पाटील यांनी केले आहे.

## मी खडसेंच्या सीडीची वाट बघत आहे -राज ठाकरे

**पुणे (अभिजीत येरल्लू):** पुण्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते नवीन पक्ष कार्यालयाचे उद्घाटन झाले. राज ठाकरे उद्घाटनानंतर माध्यमांशी बोलताना म्हणाले की, निवडणुकीच्या तयारीची सुरुवात या कार्यालयातून झाली का? तर हो झाली आहे. मनसेचे वातावरण आगामी निवडणुकांमध्ये चांगलेच असेल. सध्या माझे इंजिन मीच चालवत आहे. निवडणुकांमध्ये परिस्थितीनुसार एकला चलो रे अशी भूमिका राहील, असे राज ठाकरे म्हणाले. ते आरक्षणाविषयी बोलताना म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या वेळेला मुंबईला मोर्चा निघाला होता. त्यावेळी सगळेच नेते गेले होते. त्यावेळी सगळ्यांना मान्य होते, तर मग अडले कुठे. केंद्राच्या सरकारला मान्य आहे, राज्य सरकारला मान्य आहे. मग अडवले कुणी? न्यायालयात व्यवस्थित मांडल जात नाही का? फक्त माथी भडकवायची आहेत का? असा सवाल राज ठाकरेंनी केला. ते म्हणाले की, सगळ्यांना एका व्यासपीठावर बसवा आणि विचारा. कोण कुणाचा शत्रू आहे हेच कळत नाही. समाजाचे प्रश्न आले की तोंड फिरवायचे. आता समाजाने विचारले पाहिजे. आरक्षण प्रकरणी राजकारण आहे का काय आहे, हे समाजाने बघितले पाहिजे, असे राज ठाकरे म्हणाले. राज ठाकरे विमानतळाच्या नामकरण प्रकरणी आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार करत म्हणाले की, विमानतळ नाव प्रकरणी मी सर्व बोललो आहे. पुण्यात मी स्थायिक झालो, तर मी राज



मोरे नाही होणार, राज ठाकरेच राहणार आहे. विमानतळ फक्त शिफ्ट होत आहे, तर नाव बदलण्याचा प्रश्नच येत नसल्याचे ते म्हणाले. ईडीच्या कारवाईसंदर्भात बोलताना राज ठाकरे म्हणाले की, काँग्रेस असताना ही असाच गैरवापर झाला. भाजप असतानाही तोच वापर होत आहे. ईडीचा बाहुली म्हणून वापर करू नये. ज्यांनी खरे गुन्हे केले, ते गुन्हेगार मोकाट फिरत आहेत. मी खडसेंच्या सीडीची वाट बघत असल्याचेही राज ठाकरे म्हणाले. राज ठाकरे म्हणाले की, नारायण राणे मंत्री झाल्यानंतर मी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी फोन केले होते, पण त्यांचे फोन बंद होते. त्यांच्या मुलाला पण फोन केला होता, असे ते म्हणाले.

## रेशनवरील तांदूळ घोटाळ्याचे धागेदोरे वरपर्यंत, देवेंद्र फडणवीसांचा गंभीर आरोप

**नागपूर (विशाल पाटील)-** रेशनवरील तांदूळ घोटाळा प्रकरणात विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर आरोप केले आहेत. तांदूळ घोटाळ्याचे धागेदोरे वरपर्यंत गेले आहेत. पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर जिल्ह्यापर्यंत तांदूळ घोटाळ्याची व्याप्ती असल्याचं फडणवीस यांनी म्हटलंय. या घोटाळ्यात अन्न पुरवठा विभागाचे अधिकारी, राईस मिलचे मालक अडकण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे. देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या या गंभीर आरोपावर सत्ताधारी महाविकास आघाडी सरकार काय निर्णय घेणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. पूर्व विदर्भात पंतप्रधान जनकल्याण योजनेतील रेशनवरील तांदूळ घोटाळ्याचे आरोप होत आहेत त्याचे धागेदोरे खूप लांबपर्यंत गेले असल्याचा आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केलाय. या तांदूळ घोटाळ्याची अद्याप चौकशी झाली नसल्यानं शंका वाढल्याचंही फडणवीस यांनी म्हटलंय. चौकशी झाल्यास



अनेक बडे मासे अडकण्याची शक्यता आहे. त्यात अन्न पुरवठा अधिकारी आणि राईस मिलच्या मालकांचा समावेश असण्याचीही शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. ज्यांनी सहकार चळवळीत चुकीचं काम केलं. सहकार बुडवला त्यांनाच या नव्या खात्याबाबत भीती आहे. मात्र, ज्यांनी सहकार श्रेत्रात चांगलं काम केलं, त्यांनी या नव्या खात्याचं स्वागतच केल्याचं फडणवीस म्हणाले. केंद्रीय मंत्री अमित शाह हे खूप आधीपासून सहकार क्षेत्रात काम करत आहेत. त्यांच्या राजकारणाची सुरुवातच सहकारातून झाल्याचं फडणवीस म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसच्या मुंबईतील आंदोलनात बैलगाडी कोसळल्यावरुन जोरदार टोलेबाजी केली. 'काँग्रेसच्या आंदोलनात बैलगाडी कोसळल्याचा व्हिडीओ पाहिला तर राहुल गांधी यांना राष्ट्रीय नेता म्हटल्याचं बैलांनाही आवडलेलं दिसत नाही. त्यामुळे ती बैलगाडी तुटली, असं ते चित्र आहे. पण माझ्या त्यांना शुभेच्छा आहेत,' अशी खोचक टीका फडणवीसांनी केलीय.



संपादक:- राकेश शंकर गोरे

# नागरी सेवांमधील संधींचे मृगजळ

**नागरी सेवेच्या स्पर्धा-परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखतीसाठी किती काळ ताटकळत रहावे लागेल, या वैफल्यामुळे एका तरुणाने नुकतेच आपले जीवन संपविले. अवघ्या २४ व्या वर्षी त्याने हे दुर्दैवी पाऊल उचलल्यामुळे आजच्या तरुणाईविषयी सगळयांच्याच मनात चिंता निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. तो मुलगा त्याच्या कुटुंबाचा एक आधार होता. आप्तेष्टांसाठी कदाचित एक आदर्श होता. मैत्रीण असेल तर तिच्या भविष्याची आस होता. तो नाही म्हटल्यावर या सगळयांच्या स्वप्नांची राखरांगोळीच झाली, असे म्हणावे लागेल.**

तटस्थपणे या घटनेकडे पाहिल्यास निश्चितच आपण सर्व अंतर्मुख होऊ! जीवन संपविण्याइतक्या टोकाच्या निर्णयाला जबाबदार कोण, असा प्रश्न मनात येतो. पण त्यापेक्षा असे का व्हावे किंवा होत आहे, याची चर्चा होणे आवश्यक आहे. निदान, भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून काय करता येईल, हे पाहावे लागेल. ब्रिटिशांनी भारतात मेकॉले शिक्षण पद्धतीचा आधारावर प्रशासकीय कामकाजात विशेषत: सारा वसुली आणि महसूल वाढण्यासाठी नागरी सेवांची निर्मिती केली. स्वातंत्र्यानंतर आय.ए.एस.आणि तत्सम सेवांसाठी 'केंद्रीय लोकसेवा आयोग' निर्माण करून भारतभरातून योग्य ते पात्र उमेदवार या सेवेत सामील होतील, हा उद्देश ठेवला. महाराष्ट्राचा विचार केल्यास १९५० ते १९८० या दशकांत महाराष्ट्रातील अनेक उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी केंद्राच्या अखत्यारीतील सेवांतून आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे, हे निर्विवाद आहे.

महाराष्ट्रातील तत्कालीन राजकीय नेतृत्वानेही केंद्रातील अधिकाऱ्यांना बरोबर घेऊन महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी आणि विकासासाठी प्रयत्न केले. मात्र १९८०नंतर हळूहळू या परंपरेत खंड पडत गेला आणि केंद्रात महाराष्ट्रातील अधिकऱ्यांची उणीव जाणवू लागली. याचे कारण याच काळात इतर राज्यांतूनदेखील या सेवांबाबत जागरुकता निर्माण झाल्यामुळे या सेवेत सामील होण्यासाठी अटीतटीची स्पर्धा सुरु झाली. दुसरे असे, की १९८० नंतर महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रात प्रगत आणि अग्रेसर झाल्यामुळे अनेक तरुणांना नोकरी धंद्याचे इतर पर्याय उपलब्ध झाले आणि नागरी सेवांचा अट्टाहास आणि आकर्षणही कमी होत गेले. पण सनदी सेवेतही आपल्या मुलांनी गेले पाहिजे, हे लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने तरुणांना नागरी सेवेच्या प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून स्पर्धा परीक्षांच्या वातावरण-निर्मितीचे प्रयत्न सुरु केले. त्यासाठी अनुदानित शासकीय संस्थांची निर्मिती आणि विद्यापीठांतून 'स्पर्धा परीक्षा केंद्रे' स्थापन करण्याचा निर्णय घेतला. सर्वात पहिले 'स्पर्धा परीक्षा केंद्र' पुणे विद्यापीठात सुरु केले. परंतु पुढच्या काही वर्षात विद्यापीठ आणि शासन संस्थांच्या स्तरावर राबविल्या जाणाऱ्या योजनांना मर्यादा पडत असल्याचे जाणवले. त्यामुळे या प्रयत्नांना अपेक्षित तेवढे यश मिळू शकत नाही, हे लक्षात आले. याचा नेमका फायदा उचलला तो खाजगी शिक्षणसंस्था आणि स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण देणाऱ्या खाजगी शिकवणी वर्ग यांनी.



केवळ 'विद्येचे माहेरघर' म्हणून नव्हे, तर पुणे आणि आजूबाजूचा परिसर भौगोलिकदृष्ट्या आणि इतर सोयी सुविधांनी महाराष्ट्राच्या मध्यवर्ती असल्याने पश्चिम महाराष्ट्र, नाशिक विभाग, मराठवाडा, कोंकण आणि राजधानी मुंबई यांना सांधणारा दुवा म्हणून अनेक स्पर्धा-परीक्षांच्या शिकवणी वर्गांनी बस्तान पुण्यात मांडले. तेव्हापासून, पुणे म्हणजे जणू काय स्पर्धा परीक्षांचे मक्का-मदिनाच असे वाटायला लागले. महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठे व विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतून कला, वाणिज्य,विज्ञान, व्यापार-व्यवस्थापन, कायदा, तंत्रशिक्षण, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शाखांतून नुकतेच उत्तीर्ण झालेले तरुण पदवीधर या खाजगी स्पर्धापरीक्षा शिकवणी वर्गांच्या रडारवर असतात. समवयस्कांच्या संगतीने अनेक विद्यार्थी या शिकवणी वर्गाकडे आकर्षित होतात.

महाराष्ट्रातील ज्यांना स्पर्धा-परीक्षेच्या तयारीसाठी दिल्लीला जाणे शक्य नसते किंवा तसे आर्थिक पाठबळ नसते, त्यांच्यासाठी महाराष्ट्रात राहूनच आपली स्वप्ने पूर्ण करायची असतात. या स्वप्नांना फुंकर घालण्याचे काम खाजगी शिकवणी वर्ग करतात. प्रतिकूल परिस्थतीशी सामना करून यशस्वी झालेल्या आयएएस, आयपीएस आणि इतर सेवा मिळविणाऱ्या उमेदवारांस रोल-मॉडेल म्हणून उभे केले जाते. सेवाव्रत भाव पाळून प्रशासकीय सेवेत मिळणाऱ्या लाभांच्या मनोराज्यात त्यांना हिंडवून आणले जाते. याचे बळी ठरतात ते खास करून ग्रामीण भागांतील तरुण. ज्यांनी सात बाराचा उतारा, जातीचे प्रमाणपत्र, डोमिसाईल मिळविण्यासाठी ग्रामपंचायतीतील 'भाऊसाहेबांची' आणि पंचायत समितीतील 'रावसाहेबांची' ऐट बघितलेली असते. त्यांना जिल्हाधिकारी आणि उप-जिल्हाधिकारी यांचा थाटमाट आणि गाडीतून साहेबाला उतरविण्यासाठी डझनभर अधिकाऱ्यांची लगबग हा डामडौल कधी ऐकून, तर कधी बघून या सेवेची भुरळ नाही पडणार तरच नवल ! परिणामी, ज्यांच्याकडे अर्धा एकर जरी जमीन असेल तरी ती गहाण ठेवतो, नाही तर विकून या शिकवणी वर्गाच्या शुल्काची तजवीज करतो. समांतर अर्थव्यवस्था

प्रचंड आत्मविश्वासाने घरातून बाहेर पडलेला तरुण बऱ्याचदा दोन वर्षांनी देखील स्पर्धा-परीक्षांतील पहिली पायरी देखील उत्तीर्ण झालेला नसतो. अशा वैफल्यावस्थेतील तरुण रिकाम्या हाताने परत गावी किंवा घरी जाऊ शकत नाही. स्पर्धा-परीक्षा आणि नागरी सेवा हेच जीवनाचे ध्येय झाल्यामुळे, इतर क्षेत्रांतील संधी आणि वय हातातून निघून गेलेले असते. स्पर्धा-परीक्षार्थींचा हा प्रवास सर्व ठिकाणी सारखाच आहे. मग ते पुणे, मुंबई, कोल्हापूर, नागपूर, अमरावती असो की दिल्ली. दिल्लीत तर करोल बाग आणि राजिंदर नगर या ठिकाणी स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी जायचे असेल तर लाखांच्या थैल्या आणि हाताशी दोन तीन वर्षे अशी तयारी करूनच जावे लागते. अशा ठिकाणी एक समांतर अर्थव्यवस्था कार्यरत असते. चहाच्या टपऱ्या, कॉट बेसिसवरची घरे, खानावळी, झेरॉक्सची दुकाने, दिवसरात्री ग्रंथालये, प्रकाशन संस्था, आणि कोचिंग क्लास अशा सगळ्यांचं अर्थकारण या स्पर्धा परीक्षार्थीच्या स्वप्नपूर्तीवर अवलंबून असते. ऐन तारुण्यात जीवन संपविण्याच्या टोकाच्या निर्णयास एका स्वतंत्र व्यक्तीला जबाबदार न ठरविता इतरही घटकांकडून येणारा दबाव याचाही विचार करणे आवश्यक आहे. काहीवेळा कौटुंबिक दबाव असतो. समाजातील असलेली पत टिकविण्यासाठी धडपडले पाहिजे, हाही दबाव असतो.

आता तरी याबाबत अधिक सखोल विचार व्हायला हवा. बाजारपेठेत मागणी कोणत्या कौशल्यांना आहे, याचा अंदाज घेणे, त्यावर आधारित प्रशिक्षण घेणे, स्वत:च्या आवडीनिवडी काय आहेत, याचा नीट विचार करून त्याच्याशी सुसंगत करीअर निवडणे, कुटुंबातील परंपरागत व्यवसायात पडून आपल्या शिक्षणाच्या जोरावर आपण तो कसा आणखी भरभराटीला आणू शकतो, हा विचार करणे, असे विविध पर्याय असू शकतात.

# राज्यमार्गातील धोकादायक कठडे हटवणार

**अंबरनाथ (शाकिल शेख)-** कल्याण-बदलापूर राज्यमार्गाच्या पूर्णत्वास अडथळा ठरणाऱ्या जलवाहिन्या वाचवण्यासाठी रस्त्याच्या मधोमध कठडे बांधण्याचा प्रताप एमएमआरडीएने गेल्या महिन्यात केला होता. या कठडय़ांमुळे दोन अपघात झाल्यानंतर अखेर एमएमआरडीएने हे कठडे तोडण्याचा निर्णय घेतला आहे. या रस्त्याच्या रुंदीकरणात भव्य जलवाहिन्या गाडण्यात आल्या आहेत. मात्र काही ठिकाणी जलवाहिन्यांची उंची रस्त्याच्या उंचीपेक्षा अधिक असल्याने त्या ठिकाणी रस्त्याच्या मधोमध तीन ते पाच फूट उंचीचे कठडे उभारण्यात आले होते. मात्र टीका झाल्यानंतर अखेर हे कठडे हटवले जाणार असून त्या कठडय़ांच्या



बाजूने वाहतूक बंद करण्यात आली आहे. कल्याण-बदलापूर राज्यमार्गाचे उल्हासनगर साईबाबा मंदिर ते अंबरनाथच्या फॉरेस्ट नाका हे काम एमएमआरडीएच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. या रस्त्याच्या कामात नियोजन न केल्याने संबंधित कंत्राटदाराने या रस्ते रुंदीकरणाच्या आड येणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जलवाहिन्यांचे स्थलांतर न करता कॉंक्रीटखाली त्या जलवाहिन्या गाडल्या होत्या. त्यामुळे भविष्यात काही बिघाड झाल्यास शहरांचा पाणीपुरवठा थांबण्याची भीती व्यक्त होत होती. मात्र असे असतानाही कंत्राटदाराने काम सुरूच ठेवले. एमएमआरडीए आणि इतर शासकीय यंत्रणांनीही याकडे कानाडोळा केला. मात्र फॉरेस्ट नाका ते लादी नाका या परिसरात एका ठिकाणी जलवाहिनीची उंची रस्त्याच्या उंचीपेक्षा अधिक झाल्याने एमएमआरडीएची अडचण झाली होती. त्यावर उपाय म्हणून कंत्राटदाराने ज्या भागात या जलवाहिन्या रस्त्याच्या मधोमध येतात त्या ठिकाणी तीन ते चार फूट उंचीचे, १५ ते २० फूट लांब आणि पाच ते सात फूट रुंद असे कठडे बांधले होते. अंबरनाथकडे जाणाऱ्या मार्गिकेवर हे कठडे तीन ठिकाणी उभारण्यात आले होते. या कठडय़ांमुळे एक मार्गिका निम्मी व्यापली जात होती. तर या कठडय़ांमुळे दोन अपघात झाले होते. त्यातील एक व्यक्ती गंभीर जखमी झाली होती. त्यानंतर कठडय़ांवर काय करता येईल याबाबत चाचपणी सुरू होती. स्थानिक आमदार डॉ. बालाजी किणीकर यांनी एमएमआरडीए अधिकाऱ्यांना हे कठडे तातडीने हटवण्याचे आदेश दिले होते. अखेर हे कठडे हटवून रस्ता विनाअडथळा करण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे. लवकरच हे कठडे जमीनदोस्त केले जाणार असून तात्पुरत्या स्वरूपात या कठडय़ांच्या बाजूने होणारी वाहतूक रोखण्यात आली आहे.

# ठाण्यातील लोकमान्यनगर भागात दुसऱ्यांदा रस्ता खचला

**ठाणे (तृप्ती गोरे)-** लोकमान्यनगर भागातील वाहतुकीसाठी महत्त्वाचा मानला जाणारा रस्ता गुरुवारी रात्री पुन्हा खचला आहे. या मार्गावरील वाहतूक इंदिरानगरमार्गे वळविण्यात आली आहे. गेल्या दहा महिन्यांत हा रस्ता दुसऱ्यांदा खचल्याने तो वाहतुकीसाठी धोकादायक बनला असून खड्डय़ात पडून कोणतीही दुर्घटना होऊ नये म्हणून स्थानिकांनी या मार्गावरील वाहतूक रोखून धरली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. या घटनेची माहिती मिळताच पालिका प्रशासनाने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी सुरू केली. आपत्ती व्यवस्थापन विभागाने घटनास्थळी धाव घेतली आणि



यांमुळे या रस्त्याखालील मातीचे परीक्षण करण्याचा निर्णय पालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतला आहे. लोकमान्यनगर भागातील डवलेनगर ते यशोधननगर हा मार्ग वाहतुकीसाठी महत्त्वाचा मानला जातो. या मार्गावरून टीएमटी बसगाडय़ांची सतत वाहतूक सुरू असते. हा रस्ता गुरुवारी रात्री खचला आणि त्याठिकाणी ७ ते ८ फूट खोल खड्डा पडला. वाहन याठिकाणी मार्गरोधक उभारून रस्ता वाहतुकीसाठी बंद केला. शुक्रवारी सकाळी ठाण्याचे महापौर नरेश म्हस्के यांच्यासह शहर अभियंता रवींद्र खडताळे यांनी याठिकाणी पाहणी दौरा केला. दोनदा हा रस्ता खचल्याने तो वाहतुकीसाठी धोकादायक बनला असून या पार्श्वभूमीवर शुक्रवारी सायंकाळी पालिका पदाधिकारी आणि प्रशासनाने तातडीची बैठक बोलाविली होती.

# निर्बंधांनंतरही दुकाने सायंकाळी खुली

**ठाणे (गणेश बागडे)-** संभाव्य तिसरी लाट तसेच करोनाच्या उत्परिवर्तित विषाणूचा धोका निर्माण झाल्याने काही दिवसांपूर्वी ठाणे शहरातील दुकाने सायंकाळी चारनंतर बंद करण्याचे आदेश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. असे असतानाही व्यापाऱ्यांकडून या आदेशाला केराची टोपली दाखविली जात आहे. शहरातील जांभळीनाका बाजारपेठ, गोखले रोड, कोपरी, घोडबंदर भागांतील दुकाने सायंकाळ चार नंतरही छुप्या पद्धतीने खुली ठेवली जात आहेत. पोलीस तसेच महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडूनही याकडे कानाडोळा केला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून संभाव्य तिसरी लाट आणि करोनाच्या उत्परिवर्तित विषाणूचा धोका



निर्माण झाल्याने जिल्ह्यातील दुसऱ्या स्तरामध्ये असणाऱ्या ठाणे शहराचा तिसऱ्या स्तरामध्ये समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार शहरातील दुकाने, उपाहारगृहे आता सकाळी ७ ते सायंकाळी ४ पर्यंत खुली राहतील. हे आदेश केवळ कागदोपत्री असल्याचे आता दिसून येत आहे. शहरातील जांभळीनाका, गोखले रोड, नौपाडा, घोडबंदर परिसर, कोपरी, वागळे इस्टेट या भागांतील कपडे, भांडी, खाद्यपदार्थ विक्रीचे दुकानमालक सायंकाळी चार नंतरही दुकानांचे दार अर्धवट खुले ठेवून वस्तूंची विक्री करताना दिसत आहेत. यापूर्वी प्रशासनाने लागू केलेल्या निर्बंधांमध्ये पोलीस तसेच महापालिका कर्मचाऱ्यांकडून गस्ती घातली जात होती. निर्बंधांचे पालन करण्याचे आवाहन प्रशासनाकडून नागरिकांना केले जात होते. आता पोलिसांकडून अनेक ठिकाणी कारवाई तसेच गस्तीही घातली जात नाही. दुकानदारांविरोधात कारवाई करण्याचे काम आमचे नसल्याचे ठाणे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले. तर छुप्या पद्धतीने दुकाने खुली राहिल्यास कारवाईच्या नावाखाली व्यापाऱ्यांना महापालिका किंवा पोलिसांकडून 'त्रास'ही दिला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे दुकाने पूर्णपणे खुली ठेवली जावी, असे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

## उल्हासनगरातील धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासासाठी उच्चस्तरीय समिती

**उल्हासनगर (प्रतिनिधी):** उल्हासनगर येथील धोकादायक इमारतींच्या प्रश्नावर व्यवहार्य मार्ग काढण्यासाठी महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षेताखाली उच्चस्तरीय समिती गठीत



करण्यात आली असून या समितीला १५ दिवसात अहवाल सादर करण्यास सांगण्यात आल्याची माहिती नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी दिली. उल्हासनगरातील धोकादायक इमारतींच्या प्रश्नावर तोडगा काढण्याच्या दृष्टिकोनातून मंत्रालयात एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यात प्रामुख्याने या धोकादायक इमारतींना लवकरात लवकर नियमित करण्यासाठी सर्वकष धोरण तयार करण्यावर चर्चा करण्यात आली.

# ठाण्यातील अंतर्गत मेट्रोसाठी वाहनतळांचे नियोजन

**ठाणे (दिगंबर जाधव)-** ठाणे ते कासारवडवली दरम्यान उभारण्यात येणाऱ्या दहा मेट्रो स्थानकांच्या परिसरात वाहनतळांचा विचार करण्यात आला नसला तरी ठाणे शहरातील अंतर्गत मार्गावर प्रस्तावित असलेल्या मेट्रोलाइट रेल्वे (एलआरटी) स्थानकांच्या परिसरात वाहनतळ उभारण्याचे ठरविण्यात आले आहे. महापालिकेने यासंबंधीचा प्रकल्प आराखडा तयार करताना वाहनतळांसाठी नियोजन केले आहे, अशी माहिती महापालिकेतील सूत्रांनी दिली. यापैकी काही स्थानकांच्या परिसरात वाहनतळासाठी जागा शोधण्याचे काम प्रशासनाकडून सुरू आहे. ठाणेकरांना सार्वजनिक वाहतुकीचा आणखी



एक पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी पालिकेने अंतर्गत मेट्रोलाइट रेल्वेचा प्रस्ताव पुढे आणला आहे. या प्रकल्पासाठी ७ हजार १६५ कोटींचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून पालिकेने तो राज्य शासनाकडे पाठविला होता. या प्रकल्पात एकूण २२ स्थानके असणार आहेत. या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना पालिकेने वाहनतळांचा प्रामुख्याने विचार केल्याची माहिती पालिकेतील एका अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर दिली. ठाणे महापालिका क्षेत्रात पुरेशी वाहनतळे उपलब्ध नाहीत. ठाणे स्थानक परिसरात वाहनतळांची सुविधा असली तरी ती अपुरी पडू लागली आहे.

## जिल्ह्यात करोना काळातही दोन लाख वाहनांची विक्री

**ठाणे (सतिश सोनावणे)-** करोना प्रादुर्भावामुळे टाळेबंदी तसेच सततचे निर्बंध यामुळे मंदीसदृश वातावरण असले तरी गेल्या दीड वर्षांमध्ये ठाणे जिल्ह्य़ात दोन लाखांहून अधिक वाहनांची विक्री झाल्याची बाब ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाच्या आकडेवारीतून समोर आली आहे. ठाणे, मीरा-भाईंदर आणि भिवंडी या शहरांत सर्वाधिक तर नवी मुंबईत सर्वात कमी वाहनांची विक्री झाली आहे. करोना निर्बंधाच्या काळात खासगी वाहनाने प्रवास करावा लागत असल्यामुळे नागरिक वाहनांची



खरेदी करत असल्याचे परिवहन विभागातील अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी टाळेबंदी आणि निर्बंध लागू करण्यात आले आहेत. सततची टाळेबंदी आणि निर्बंध यामुळे अनेकांचे व्यवसाय ठप्प झाले आहेत. काहींच्या नोकऱ्या गेल्या आहेत. असे असले तरी ठाणे जिल्ह्य़ात २ लाख ३३ हजार ७१३ वाहनांची विक्री झाल्याची बाब पुढे आली.

# सॅटिस प्रकल्पासाठी खारफुटीची कत्तल?

**ठाणे (आकाश कांबळे):** ठाणे महापालिकेकडून कोपरी भागात सुरू असलेला सॅटिस प्रकल्प पर्यावरणाची पायमल्ली करत उभा राहात असल्याच्या तक्रारींमुळे नव्याने वादात सापडला आहे. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी जुन्या कोपरी पोलीस ठाण्यामागील खारफुटीच्या जागेत ठेकेदाराने कोणतीही परवानगी न घेता राडारोड्याचा मोठा भराव टाकून खारफुटीची कत्तल केल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत.

कोपरी भागात ठाणे महापालिकेने स्मार्टसिटी प्रकल्पांतर्गत सॅटिस प्रकल्प उभारणीचे काम हाती घेतले आहे. दोन वर्षांपासून हे बांधकाम सुरू आहे. रेल्वे स्थानकाच्या पूर्व भागातून निघणारा उड्डाणपूल पुढे कोपरी परिसरातून महामार्गाच्या दिशेने निघणार आहे. या प्रकल्पातील बराचसा भाग हा खाजण जमिनीत मोडतो. या प्रकल्पाच्या बांधकामादरम्यान खाडीकिनाऱ्यावरील खारफुटींची मोठ्या प्रमाणावर कत्तल झाल्याचा दावा ठाण्यातील जनशक्ती बहुउद्देशीय संस्थेने केला होता. फेब्रुवारी २०२० मध्ये या संस्थेने जिल्हा प्रशासनाकडे पहिली तक्रार नोंदवली. यानंतर तलाठी कार्यालयामार्फत या जागेचा पंचनामा करण्यात आला. या पंचनाम्यादरम्यान १९ हजार ९१ ब्रास भराव या जागेत टाकण्यात आल्याचे निष्पन्न झाले होते. तसेच खारफुटींची कत्तलही झाल्याचे या पंचनाम्यामध्ये



नमूद करण्यात आले होते. मंडळ अधिकाऱ्यांनीही जागेची पाहणी केल्यानंतर हे काम किनारा नियमन क्षेत्रामध्ये सुरू असल्याचे स्पष्ट करण्यात आले. हे करत असताना पर्यावरणासंबंधी कोणत्या परवानग्या घेण्यात आल्या आहेत, असे प्रश्न उपस्थित करण्यात आले. मात्र तक्रारदारांना महापालिकेने अपेक्षित उत्तर दिले नाही.

यासंबंधी जनशक्ती बहुउद्देशीय संस्थेने ऑगस्ट २०२० मध्ये सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाने ऑगस्ट ते डिसेंबर २०२० या कालावधीत ठाणे महापालिका, जिल्हा प्रशासनाला एक पत्र आणि चार स्मरणपत्रके देत तात्काळ उत्तरे मागितली होती. त्यानंतरही दोन्ही विभागांकडून एकही उत्तर प्राधिकरणाला मिळाले नाही. त्यामुळे प्राधिकरणाने एक बैठक घेऊन विशेष अधिकारात हा विषय पुढे आणला. चार वेळा स्मरणपत्रके देऊनही दोन्ही विभागांनी अहवाल दिला नसल्याचे या बैठकीत सूचित करण्यात आले. तसेच यासंबंधी सविस्तर अहवाल तातडीने सादर करा, अन्यथा महापालिका आणि जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्राधिकरणाकडून देताच खडबडून जागे झालेल्या स्मार्ट सिटी विभागाने याप्रकरणी सविस्तर अहवाल सादर केला असून कोणत्याही नियमांचे उल्लंघन केलेले नाही, असा दावा केला आहे.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press gala no 3/4, amin Ind. estate, Sonawala Cross Road no 2, Goregaon (East), Mumbai-400063, Maharashtra and Published at Vishnu Sadan society, Ramchandra Sukhai chawl no 1, Room no 4, Jai hind nagar, Khar (East), Dist- Mumbai-400051, Maharashtra. **Editor: Rakesh Shankar Gore**

R.N.I. No. MAHMAR/2010/33301. Off. No.: 022-2651 5151 Mob. 9809386748 / 9803386748, **website:** maharashatracrimetimes.com, **Email:** Info@maharashtracrimetimes.com **Legal Advisor: D. K. Pandey (B.A.L.L.B.) (High Court Mumbai)**

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# अपघात क्षेत्रांवर कायमस्वरूपी तोडगा नाहीच

**मुंबई (दिपेश गोरिवले)-** धोकादायक वळणदार रस्ते, संरक्षक भिंत किंवा कठडे नसणे इत्यादी राज्यातील रस्ते अपघातांस कारणीभूत ठरणाऱ्या 'अपघात क्षेत्रां'वर (ब्लॅक स्पॉट) गेल्या सात वर्षांत कायमस्वरूपी तोडगा काढण्यास राज्यातील सर्वच यंत्रणांना अपयशच आले



आहे. १,३२४ अपघात क्षेत्रांपैकी ७५७ क्षेत्रांवरच कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. २०१४ पासून ते आतापर्यंत राज्यात एक हजार ३२४ अपघात क्षेत्रांची नोंद झाली आहे. २०१६ नंतर यात ५८५ अपघात क्षेत्रांची भर पडल्याने यात वाढ झाली होती. मद्य पिऊन किंवा बेदरकारपणे वाहन चालविणे, ओव्हरटेक करणे ही प्रमुख कारणे अपघातांमागे असली तरी रस्त्यांची दुरवस्था, धोकादायक वळणे, संरक्षक भिंत किंवा कठडे नसणे, गतिरोधक नसणे हे घटकदेखील तेवढेच कारणीभूत ठरत आहेत. ५०० मीटर क्षेत्रामध्ये सलग तीन वर्षांत एकूण पाच प्राणांतिक अपघात किंवा गंभीर अपघात अथवा एक किंवा त्यापेक्षा जास्त अपघात झाले असतील अशा अपघात प्रवण क्षेत्रांची (ब्लॅक स्पॉट) माहिती गोळा केली जाते. आजघडीला अपघात क्षेत्रांची संख्या सुमारे १,३२४ इतकी असल्याची माहिती परिवहन विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. २०१४ ते २०१६ या काळात ७३९ अपघात क्षेत्रे होती. त्यानंतर त्यात वाढच होत आहे. मुंबईबरोबरच, नाशिक शहर व ग्रामीण, नागपूर, नांदेड, कोल्हापूर, सातारा, अमरावती शहर, औरंगाबाद शहर, नवी मुंबई शहर, पालघर, रत्नागिरी, रायगड, पुणे ग्रामीण, ठाणे शहर व ग्रामीणसह अन्य शहर व ग्रामीण भागांत अपघातक्षेत्र अधिक आहेत. राज्यातील १ हजार ३२४ अपघात क्षेत्रांतील ७५७ क्षेत्रांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

# अग्निशमन सेवा शुल्क वसुलीला तात्पुरती स्थगिती

**मुंबई (राकेश गायकवाड)-** अग्निशमन सेवा शुल्क आणि वार्षिक शुल्क वसूल करण्यावरून शुक्रवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत गोंधळ उडाला. करोनाकाळात सर्वसामान्यांकडून वार्षिक शुल्क वसूल करण्यास सदस्यांनी विरोध केला. तसेच जे विकासक प्रकल्प पूर्ण करून गेले असतील त्यांच्याकडून शुल्क वसूल कसे करणार, असा आक्षेप सदस्यांनी घेतला. त्यामुळे विकासकांची माहिती गोळा करेपर्यंत शुल्कवसुलीला स्थगिती द्यावी अशी मागणी सदस्यांनी के ली.

अग्निशमन सेवा शुल्कवसुलीचा विषय गेल्या काही दिवसांपासून पालिको वर्तुळात चांगलाच धुमसतो आहे. गेल्या सलग दोन बैठकांमध्ये या विषयावरून बैठकीत प्रशासन विरुद्ध लोकप्रतिनिधी अशी खडाजंगी होत आहे. या शुल्कवसुलीवर प्रशासन ठाम असल्यामुळे शुक्रवारच्या बैठकीत सदस्यांनी पुन्हा हाच मुद्दा उपस्थित के ला. भाजपचे गटनेते प्रभाकर शिंदे यांनी याबाबत मुद्दा उपस्थित के ला व सभा तहकूब करण्याची मागणी केली. या वेळी झालेल्या चर्चेत सर्वपक्षीय सदस्यांनी सहभाग घेतला व शुल्कवसुलीला विरोध केला. कायद्यात तरतूद असल्यामुळे ही शुल्कवसुली करावीच लागणार



आहे, असे अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे यांनी या वेळी स्पष्ट केले. मात्र त्यामुळे सदस्यांचे समाधान झाले नाही. अग्निशमन शुल्क विकासकांकडून वसूल केले जाणार असले तरी जो विकास प्रकल्प पूर्ण झाला असेल त्याच्या विकासकाला कसे शोधणार, त्याच्याकडून शुल्क कसे वसूल करणार, असा सवाल भालचंद्र शिरसाट यांनी उपस्थित केला. मात्र त्यावर प्रशासनाला ठोस उत्तर देता आले नाही. त्यामुळे भाजपच्या सदस्यांनी सभात्याग केला. मात्र तरीही अन्य सदस्यांनी पुढे चर्चा सुरू ठेवली.

## वैद्यकीय महाविद्यालयांच्या जागांबाबत पालिका उदासीन

**मुंबई (विशाल पाटील)-** वैद्यकीय महाविद्यालयांच्या ५० टक्के जागा वाढविण्यासाठी केंद्र सरकारने योजना आणल्यानंतरही गेल्या पाच वर्षांत पालिकेने त्याकरिता मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाकडे अर्ज केलेला नाही. केंद्र सरकारने १० वर्षे झालेल्या वैद्यकीय महाविद्यालयांकरिता ही योजना आणली होती. पालिकेची चारही वैद्यकीय महाविद्यालये ५० वर्षांहून अधिक जुनी असतानाही प्रशासनाने त्याबाबत अद्याप कोणेतही पाऊल उचललेले नाही. केंद्र सरकारने संपूर्ण देशात दहा हजारांहून अधिक वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागा वाढविण्यासाठी महत्त्वाकांक्षी योजना २०१५ साली जाहीर केली होती. या योजनेंतर्गत ज्या वैद्यकीय महाविद्यालयांना १०




वर्षे झालेली आहेत अशा सर्व शासकीय/ महापालिका/ खासगी महाविद्यालयांनी अर्ज केल्यास अटी व शर्तीच्या अधीन राहून ५० टक्के प्रवेश क्षमता वाढवून देण्याचे धोरण जाहीर केले होते. मुंबई महानगरपालिकेची केईएम, शीव, कूपर, नायर अशी चार वैद्यकीय महाविद्यालये ५० वर्षांहून अधिक जुनी आहेत. परंतु यापैकी केवळ लोकमान्य टिळक शीव रुग्णालय वैद्यकीय महाविद्यालयाने २०१५ मध्ये ५० टक्के जागावाढीसाठी अर्ज करून वर्ष २०१६ पासून पदवीधर अभ्यासक्रमासाठी १०० ऐवजी १५० जागा वाढविण्यास परवानगी मिळवली आहे. मात्र महापालिकेच्या अन्य वैद्यकीय महाविद्यालयांतून ५० टक्के प्रवेश क्षमता वाढीसाठी साधा अर्जही केला गेला नाही, असा आरोप भाजपने केला आहे.

## मुंबईत जन्मदरामध्ये घट

**मुंबई (अलीहूसेन शेख)-** करोना साथीच्या काळात टाळेबंदीमुळे मोठ्या प्रमाणात कुटुंबे शहराबाहेर स्थलांतरित झाल्यामुळे २०१९ च्या तुलनेत २०२० मध्ये जन्मदरात सुमारे २६ टक्क्यांनी घट झाली आहे. २०१५ नंतर प्रथमच एवढी मोठी घट जन्मदरामध्ये झाल्याचे आढळले आहे.



करोना साथीच्या उद्रेकाचा परिणाम मुंबईतील जन्मदरावर झाल्याचे पालिकेच्या आकडेवारीतून आढळले आहे. २०१५ मध्ये १ लाख ७४ हजार बालकांचा जन्म झाला होता. त्यानंतर २०१६ मध्ये यात २१ हजार ९५० ने घट होत सुमारे १ लाख ५२ हजार बालके जन्माला आली. त्यानंतर उत्तरोत्तर यात कधी थोडी घट तर कधी थोडी वाढ झाल्याचे आढळले. २०१९ मध्ये सुमारे १ लाख ४८ हजार बालकांचा मुंबईत जन्म झाला होता. २०२० मध्ये मात्र यात सर्वात मोठी म्हणजे ४२ हजारांनी घट झाल्याचे दिसून आले. परिणामी २०१९ च्या तुलनेत २०२० मध्ये जन्माला आलेल्या बालकांचे प्रमाण सुमारे २६ टक्क्यांनी घटले आहे. २०२० मध्ये जन्मलेल्या बालकांमध्ये ५२ टक्के मुले तर ४८ टक्के मुलींचा समावेश आहे. २०१९ मध्ये मुलांचे प्रमाण ४७.२३ टक्के आणि मुलीचे ४४.२४ टक्के होते. यामुळे जन्मदरातही (दर एक हजार लोकसंख्येमागे) २०२० मध्ये गेल्या पाच वर्षांतील मोठी घट आहे. मुंबईतही घरी प्रसूती होण्याची संख्या २०१५ मध्ये १,४६५ होती. उत्तरोत्तर यात घट होऊन २०१९ मध्ये ३५३ महिलांची प्रसूती घरी झाली.

# ३० वर्षांखालील म्हाडा इमारतींचा पुनर्विकास आता शक्य!

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)- शहरातील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासात येणारे अडथळे दूर करण्यात महाविकास आघाडी सरकारला अखेर यश आले आहे. राज्य शासनाने जारी केलेल्या सुधारित नियमावलीमुळे इमारत व दुरुस्ती मंडळाच्या निकृष्ट दर्जाच्या ३० वर्षांखालील पुनर्रचित इमारतींचा पुनर्विकासही आता शक्य होणार आहे.**

जुन्या इमारतींच्या पुनर्विकासात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड आग्रही होते. सुरुवातीपासूनच त्यांनी पाठपुरावा केला होता. अखेर नगरविकास विभागाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. शहरात प्रामुख्याने इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने इमारती बांधल्या आहेत. या इमारतींचे बांधकाम इतके निकृष्ट आहे की, यापैकी जवळपास सर्वच इमारतींचा पुनर्विकास करणे आवश्यक बनले आहे. परंतु त्यामुळे विकास नियंत्रण नियमावलीत



तरतूद करणे आवश्यक होते. नव्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार ३० वर्षे वा त्यापुढील इमारती किंवा सक्षम प्राधिकरणाने धोकादायक ठरविलेल्या इमारतींचा पुनर्विकास करता येणे शक्य होते. त्यामुळे शहरातील म्हाडावर पुनर्रचित केलेल्या इमारती या ३० वर्षांखालील आहेत. मात्र या इमारतींचाही आता पुनर्विकास करता येणार आहे. तशी तरतूद ३३(७) व (९) या सुधारित नियमावलीत करण्यात आली आहे. मात्र सदर इमारतीला पुनर्विकासाची आवश्यकता असल्याबाबत पालिका आयुक्त वा उच्चस्तरीय समितीने निर्णय देणे नव्या नियमावलीत बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय पंतप्रधान अनुदान योजनेतील इमारतींचाही पुनर्विकास आता शक्य होणार असून ३ इतके चटईक्षेत्रफळ मिळणार आहे. पूर्वीच्या नियमावलीत रहिवाशांची मंजुरी ही नोंदणीकृत असावी लागत होती. आता नोटराईज्ड मंजुरीही सुधारित नियमावलीत मान्य करण्यात आल्यामुळे विकासकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे. जुन्या इमारतींच्या पुनर्विकासात विकासकाला म्हाडाला अतिरिक्त सदनिका द्याव्या लागत होत्या. त्यापोटी म्हाडा विकासकाला शुल्क अदा करीत असे. आता मात्र या सदनिका म्हाडाला मोफत मिळणार आहेत. मास्टर लिस्टवरील रहिवाशांसाठी या सदनिका उपलब्ध करून देणे म्हाडाला शक्य होणार आहे. पूर्वी एकूण भूखंडावर तीन इतके चटईक्षेत्रफळ वा पुनर्वसनासाठी लागणारे चटईक्षेत्रफळ व त्यावर ५० टक्के प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्रफळ यापैकी अधिक जे असेल ते चटईक्षेत्रफळ जुन्या इमारतीचा पुनर्विकास करण्यासाठी उपलब्ध होत होते. तरीही प्रकल्प अव्यवहार्य असल्याची ओरड विकासकांकडून केली जात होती. त्यामुळे दक्षिण तसेच दक्षिण मध्य मुंबईत अनेक प्रकल्प रखडले होते.

## महागाईचा रौद्रावतार



**मुंबई (प्रतिनिधी)-** चढ्या इंधन दरामुळे वाहतूक खर्चात वाढ झाल्याने मुंबई, ठाणे, कोकणासह विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रासह राज्याचे सर्व भाग महागाईच्या वणव्यात होरपळले आहेत. भाज्या, फळे, डाळी आणि दुधाचे दर वधारल्याने सामान्यांच्या घरखर्चात वाढ झाली आहे. मालवाहतूकदारांनी भाडेवाढ केल्याने घाऊक तसेच किरकोळ बाजारात अन्नधान्याच्या दरांमध्ये २० ते २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

इंधनाचे वाढते दर आणि टाळेबंदीतील निर्बंधांचा थेट परिणाम जीवनावश्यक वस्तूंच्या दरांवर होताना दिसत आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई तसेच आसपासच्या परिसराला होणारी जीवनावश्यक वस्तूंची आवक स्थिर असतानाही किरकोळ बाजारात जवळपास सर्वच भाज्यांचे दर वाढले आहेत. डाळींच्या दरांतही किलोमागे १० ते २० रुपयांनी वाढ झाली आहे. घाऊक बाजारात भाज्यांचे दर काही प्रमाणात स्थिर असले तरी इंधन दरवाढीचे कारण पुढे करत किरकोळ बाजारात ग्राहकांची अक्षरश: लूट सुरू आहे. मुंबई महानगर परिसरातील भाजी बाजार दुपारी ४ नंतर बंद होत असल्याने त्याआधी काही भाज्या चढ्या दराने विकल्या जात आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून इंधनाच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने वाहतूक खर्चात वाढ झाली आहे. परिणामी पुणे, नाशिक, सातारा जिल्ह्यांतून मुंबईत येणाऱ्या शेतमालाचे दर वाढू लागले आहेत. मुंबई महानगर परिसरास प्रामुख्याने नाशिक तसेच पुणे जिल्ह्यातून भाजीपाल्याचा पुरवठा होतो.

वाहतूक खर्च वाढल्याने घाऊक बाजारात भाज्यांचे दर काही प्रमाणात वाढले असले तरी किरकोळ विक्रेते इंधन दरवाढ आणि टाळेबंदीच्या नावाखाली भाज्यांची दुप्पट दराने विक्री करत आहेत. करोनाची संभाव्य तिसरी लाट आणि करोनाच्या उत्परिवर्तित प्रकाराच्या भीतीमुळे राज्यात २८ जूनपासून पुन्हा निर्बंध लागू करण्यात आले. त्यानुसार अत्यावश्यक वस्तूंची दुकाने तसेच बाजारपेठा सकाळी ७ ते दुपारी ४ वाजेपर्यंतच सुरू ठेवण्यास परवानगी दिली आहे. नव्या नियमानुसार विक्रीचा कालावधी कमी झाल्याने किरकोळ व्यापाऱ्यांनी वस्तूंच्या किमतींत आणखी वाढ केल्याचे आढळते.

मुंबई महानगर क्षेत्रात किरकोळ बाजारात भेंडी (६०-८० रुपये किलो), कांदा (३५ ते ४०), फ्लावर (४० ते ६० रुपये), गवार (८० ते १०० रुपये), कारली (६० ते ८० रुपये) अशा प्रमुख भाज्यांची विक्री अवाच्या सवा दराने होत आहे. घाऊक बाजारात २२ रुपये प्रति किलोने विकला जाणारा दुधी भोपळा किरकोळ बाजारात ४० ते ६० रुपयांनी विकला जात आहे.

## आघाडी-युतीचा विचार न करता पक्ष संघटना बळकट करा!

**मुंबई (विशाल कारंडे)-** कॉंग्रेस व राष्ट्रवादीच्या नेत्यांनी आपापली पक्षसंघटना बळकट करण्यासाठी कार्यक्रम व दौरे सुरू केल्यानंतर आता शिवसेनाही सावध झाली असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वा इतर निवडणुकीत आघाडी-युती होईल की नाही याची चिंता करू नका. आपल्या भागात गावागावात-तालुक्यात शिवसेना पक्ष



बळकट करण्यासाठी कामाला लागा, असा आदेश मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्यातील पक्षाच्या सर्व जिल्हाप्रमुखांना दिला आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी दूरचित्रसंवादाच्या माध्यमातून शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखांशी संवाद साधला. गावागावात शिवसंपर्क अभियान राबवण्याचा आदेश उद्धव ठाकरे यांनी सर्व शिवसेना जिल्हाप्रमुखांना दिला असल्याची माहिती अनिल देसाई यांनी दिली. हे अभियान १२ जुलै ते २४ जुलै दरम्यान राबवण्यात येणार असल्याचे यांनी सांगितले.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी जिल्हाप्रमुखांशी संवाद साधत शिवसंपर्क अभियानाच्या माध्यमातून थेट पक्षसंघटना वाढीचा कार्यक्रम दिला. यात विधानसभानिहाय, तालुकानिहाय आणि पंचायचनिहाय कामे करणे अपेक्षित आहे. अधिकाधिक गावांमध्ये पोहोचत लोकांशी संपर्क वाढवण्यावर या अभियानात भर दिला जाणार आहे.

## बंदोबस्तासाठी पोलिसांच्या मदतीला नागरिकांची फौज

**मुंबई (योगेश होळंब)-** करोनाची दुसरी लाट उतरंडीवर असताना सोनसाखळी-मोबाइल चोरी आदी रस्त्यांवर घडणारे गुन्हे वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी स्थानिक नागरिकांना सोबत घेऊन नेमक्या ठिकाणी बंदोबस्त ठेवण्यास सुरुवात केली आहे. नागरिकांमधून गुणी स्वयंसेवक लाभल्यास अपुऱ्या मनुष्यबळामुळे निर्माण होणाऱ्या अनेक अडचणी दूर होतील, मोक्याच्या ठिकाणी बंदोबस्त ठेवून गुन्हेगारांना प्रतिबंध करता येईल आणि पोलीस-नागरिक यांच्यातील दरी कमी होईल, या उद्देशाने हा उपक्रम सुरू केल्याचे जुहू पोलीस ठाण्यातून सांगण्यात आले.

जुहू पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक शशिकांत माने यांनी बंदोबस्तासाठी स्वयंसेवक सोबत घेण्याची कल्पना सहकाऱ्यांसमोर मांडली. त्यास अनुसरून जुहू पोलीस ठाण्याच्या हद्दीत गर्दी होणाऱ्या, सतत गुन्हे घडणाऱ्या ठिकाणांची यादी तयार करण्यात आली. यापैकी तीन ते चार ठिकाणी कायमस्वरूपी नाकाबंदी तर उर्वरित सहा ते आठ ठिकाणी मनुष्यबळ



तैनात ठेवावे, असा निर्णय घेण्यात आला. गुन्ह्यांना आळा घालण्याच्या मोहिमेत पोलिसांसोबत सहभागी व्हावे, असे आवाहन पोलीस ठाण्याच्या हद्दीत वास्तव्य करणारे नागरिक, व्यावसायिक, फेरीवाले, रिक्षा-टॅक्सीचालकांच्या व्हॉट्सअॅप समूहावर करण्यात आले. या आवाहनास ५०हून अधिक नागरिकांनी प्रतिसाद दिला असून त्यातील ३० जणांची निवड स्वयंसेवक म्हणून करण्यात आली आहे. या स्वयंसेवकांची संख्या येत्या काही दिवसांत वाढेल. संध्याकाळी सात ते रात्री १० या तीन तासांत कायमस्वरूपी नाकाबंदी, मोक्याच्या ठिकाणी बंदोबस्तासोबत गस्त घालणाऱ्या पथकांत स्वयंसेवकांना सहभागी करून घेतले जाईल. स्वयंसेवकांना पोलिसांचे बोधचिन्ह असलेले टी-शर्ट दिले जाईल. चांगली कामगिरी करणाऱ्या स्वयंसेवकांना गौरवण्यात येईल, असे जुहू पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय मसवेकर यांनी सांगितले.शहरातील ९४ पोलीस ठाण्यांत सरासरी तीनशे अधिकारी, अंमलदारांचे मनुष्यबळ उपलब्ध आहे. बहुतांश पोलीस ठाण्यांमध्ये मंजूर पदांपेक्षा उपलब्ध मनुष्यबळ बरेच कमी आहे.

# सहा महिन्यांत सिमेंट, स्टीलच्या दरात ४० ते ५० टक्के वाढ

**मुंबई (राकेश गायकवाड)-** करोना काळात उत्पादन शुल्क वा मागणीत कोणतीही वाढ झालेली नसताना सिमेंट आणि स्टीलच्या दरात भरमसाट वाढ होत आहे. मागील केवळ सहा महिन्यांत सिमेंटच्या दरात ४० टक्क्यांनी, तर स्टीलच्या दरात ५० ते ५५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. परिणामी, बांधकाम शुल्कात २०० ते २५० प्र. चौ. फूट रुपयांची वाढ झाली आहे. याचा फटका ग्राहकांना बसत आहे. ही कृत्रिम दरवाढ असून सिमेंट-स्टील कंपन्यांच्या मक्तेदारीविरोधात केंद्र सरकारकडे दाद मागण्यात येत आहे. पण केंद्राकडून काहीही प्रतिसाद मिळत नसल्याने आता बिल्डर-कंत्राटदारांच्या संघटनांनी याविरोधात सर्वोच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे.

बांधकामातील सर्वात मुख्य घटक म्हणजे सिमेंट आणि स्टील. सिमेंटचे ९० टक्के उत्पादन करणाऱ्या १२ कंपन्या असून त्यांची देशात मक्तेदारी आहे. तर स्टीलचे उत्पादनातही काही ठरावीक कंपन्यांची मक्तेदारी आहे. त्यामुळे वर्षांनुवर्षे या कंपन्या दरात कृत्रिम वाढ करत विकासक आणि ग्राहकांची आर्थिक लूट करत असल्याचा आरोप रेरा अॅण्ड हाऊसिंग कमिटी, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया (बीएआय)चे अध्यक्ष आनंद गुप्ता यांनी केला आहे. दरम्यान, विरोधात बीएआयने २०१० मध्येच



सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्यानुसार न्यायालयाने सिमेंट कंपन्यांना ६७०० कोटी रुपये दंड ठोठावला आहे. न्यायालयाच्या या निर्णयाला कंपन्यांनी आव्हान दिले असून दंडाची १० टक्के रक्कम भरली आहे. तर अंतिम सुनावणी होईपर्यंत कोणत्याही प्रकारे कृत्रिम दरवाढ वा कृत्रिम टंचाई निर्माण करू नये, असे स्पष्ट निर्देशही दिले आहेत. पण कंपन्या मात्र आजही कृत्रिम दरवाढ आणि कृत्रिम टंचाई निर्माण करत न्यायालयाचा अवमान करत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. स्टील-सिमेंटच्या कृत्रिम दरवाढीला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने लक्ष घालावे अशी मागणी बीएआयने सर्व संबंधित विभागाकडे केली आहे. मात्र सरकारकडून याबाबत कोणतेही पाऊल उचलले जात नाही. त्यामुळे आता बीएआयने याविरोधात सर्वोच्च न्यायालयातच अवमान याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. लवकरच ही याचिका दाखल केली जाणार असल्याचेही गुप्ता यांनी सांगितले.

देशभरात दर वेगळे सिमेंटचे दर देशभरात वेगवेगळे आहेत. सिमेंटचे दर २७५ रुपये प्रति गोणीवरून ३०० ते ३२५ रुपये प्रति गोणी आहेत. तर स्टीलचे दर ३८-४० रुपये प्रति मेट्रिक टनवरून ६० ते ६५ रुपये प्रति मेट्रिक टन असे झाले आहे. एकूणच सिमेंटचे दर ४० टक्क्यांनी तर स्टीलचे दर ५० ते ५५ टक्क्यांनी वाढले आहेत.

# करोना केंद्रांच्या खासगीकरणासाठी निविदा

**मुंबई (अलीहूसेन शेख)- मुंबईत नव्याने झालेली सोमय्या, मालाड आणि कांजूरमार्ग येथील करोना केंद्रे खासगी तत्त्वावर चालविण्यास देण्यात येणार असून याच्या निविदा पालिकेने जाहीर केल्या आहेत. यात अतिदक्षता, प्राणवायू आणि सर्वसाधारण खाटांसह बालकांच्या २५० खाटाही खासगी तत्त्वावर चालविण्याकरिता खासगी संस्थांचे प्रस्ताव मागविले आहेत.**

संभाव्य तिसऱ्या लाटेमध्ये रुग्णांची संख्या वाढल्यास दुसऱ्या लाटेप्रमाणे खाटांची चणचण निर्माण होऊ नये यासाठी पालिकेने मालाड, कांजूर आणि सोमय्या येथे नवी करोना केंद्रे सुरू केली आहेत. परंतु ही केंद्रे चालविण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध करणे आणि व्यवस्थापन करणे ही जबाबदारी खांद्यावर घेण्याऐवजी पालिकेने थेट खासगी संस्थांना चालविण्यास देण्याचा निर्णय घेतला आहे. तीन महिन्यांच्या कालावधीसाठी ही केंद्रे चालविण्यासाठी २७ जूनला निविदाही जाहीर केल्या असून ३ जुलैला त्यांची मुदत संपली आहे.

वांद्रे-कुर्ला संकुलातील (बीकेसी) करोना केंद्रातील १०८ खाटांचा अतिदक्षता विभाग आणि दहिसर करोना केंद्रातील १०० खाटांचा अतिदक्षता विभागासह ६१३ प्राणवायू आणि ११७ सर्वसाधारण खाटा चालविण्यासाठी खासगी संस्थेला दिल्या होत्या. पहिल्या लाटेमध्ये मनुष्यबळ उपलब्ध होत नसल्यामुळे पालिकेने हा निर्णय घेतला होता. ३० जूनला या संस्थेचे करार संपुष्टात आले आहेत. भविष्यातही या खाटा खासगी तत्त्वावर चालविण्याचा निर्णय पालिकेने घेतला असून आता नव्याने संस्थेची निवड करण्यासाठी निविदा काढल्या आहेत. तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर सोमय्या येथे ७५० प्राणवायू खाटांसह बालकांसाठी १०० खाटांचे करोना केंद्र सुरू करण्यात येणार आहे. येथे २०० खाटांचा अतिदक्षता विभाग असणार असून या व्यतिरिक्त ५० खाटांचा बालकांसाठी अतिदक्षता विभाग असेल. मालाड येथे सुरू झालेल्या करोना केंद्रात १५३६ खाटा प्राणवायूच्या, तर ३८४ सर्वसाधारण खाटा आहेत.



याशिवाय १९० खाटांचा अतिदक्षता विभागही कार्यरत असणार आहे. कांजूरमार्ग येथील करोना केंद्रात १२०० प्राणवायू खाटा, ३०० सर्वसाधारण खाटा आणि १५० अतिदक्षता खाटा असणार आहेत. या तिन्ही करोना केंद्रांच्या या सर्व खाटा चालविण्यासाठी पालिकेने निविदा जाहीर केल्या आहेत. अतिदक्षता विभागात दर दहा खाटांमागे एक वरिष्ठ आणि दोन सहाय्यक डॉक्टर, सहा निवासी डॉक्टर, १० परिचारिका, आठ वॉर्डबॉय आणि दोन तंत्रज्ञ असणे आवश्यक आहे. ५० प्राणवायू खाटांमागे एक वरिष्ठ डॉक्टर, सहा निवासी डॉक्टर, १२ परिचारिका, १० वॉर्डबॉय आणि एक तंत्रज्ञ एवढे मनुष्यबळ असावे. १०० सर्वसाधारण खाटांमागे एक वरिष्ठ डॉक्टर, चार निवासी डॉक्टर, १५ परिचारिका, १२ वॉर्डबॉय आणि दोन तंत्रज्ञ असावेत असे या निविदेत नमूद केले आहे. खासगी संस्थांच्या प्रस्तावांचे मूल्यांकन पालिकेच्या निवड समितीकडून केले जाणार असून या समितीमध्ये अतिरिक्त पालिका आयुक्त, सार्वजनिक आरोग्य विभागाचे उपायुक्त, जम्बो करोना केंद्रांचे अधिकारी यासह वित्त विभागातील अधिकाऱ्यांचाही समावेश असेल. उपलब्ध केल्या जाणाऱ्या मनुष्यबळाचे शिक्षण आणि अनुभव, आर्थिक बाब, संस्थेचा कामाचा अनुभव याचा विचार यामध्ये केला जाईल.

# कोकणात मुसळधार! रत्नागिरी जिल्ह्यात दोन ठिकाणी पुराचे पाणी घुसले; पुढील दोन दिवस अतिवृष्टी

**मुंबई (योगेश होळंब): कोकणात धुवांधार पाऊस कोसळत आहे. मुसळधार पावसाने रत्नागिरी जिल्ह्याला झोडपून काढले आहे. गेल्या दोन दिवसांपासून पाऊस कोसळत आहे. संगमेश्वरमधील गड नदीला आणि राजापूरमधील कोदवली नदीला पूर आला आहे. पुराचे पाणी बाजारपेठेत घुसल्याने व्यापारी धास्तावले आहेत. दरम्यान, मुंबईसह कोकण, मराठवाड्यात दोन दिवस अतिवृष्टीचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे.**



मुसळधार पावसामुळे संगमेश्वर तालुक्याला चांगलेच झोडपून काढले आहे. त्यामुळे गडनदीला आलेल्या पुरामुळे माखजन बाजारपेठे पुराचे पाणी बाजारपेठेत शिरले होत. आधीच खाडीला भरती त्यात मुसळधार पाऊस त्यामुळे गडनदीच्या पाणी पातळीत कमालीची वाढ झाल्यामुळे माखजन बाजरपेठेत पुराचे पाणी शिरले होते.

राजापूरलादेखील मुसळधार पावसाचा फटका चांगलाच बसला आहे. मुसळधार पावसामुळे कोदवली नदीला पूर आल्याने राजापूरच्या जव्हार चौकात पाणी घुसले आहे. राजापूर तालुक्याला देखील मुसळधार पावसाने चांगलंच झोडपून काढलं आहे. तसेच अर्जुना नदी देखील दुथडी भरून वाहत असल्याने नदी किनारच्या लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. गेले अनेक दिवस हुलकावणी देणारा पाऊस पुढील दोन दिवसांत जोरदार कोसळणार आहे. दोन दिवसांत गडगडाट आणि कडकडाटासह मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस मुंबईसह कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा तसेच विदर्भात होईल, अशी माहिती मुंबईच्या प्रादेशिक हवामान केंद्राने दिली आहे. पावसाने दोन आठवडे दडी मारल्यानंतर शुक्रवारपासून राज्यातील अनेक ठिकाणी मध्यम ते हलका पाऊस सुरु आहे. राज्यात गेल्या १ जूनपासून सरासरी पाऊस झाला आहे. मराठवाड्यात तर आतापर्यंत सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे, अशी माहिती मुंबईच्या प्रादेशिक हवामान केंद्राचे प्रमुख डॉ. जयंत सरकार यांनी दिली आहे.

## पालघरमध्ये शालेय विद्यार्थ्यांना पोषण आहारात भेसळ, प्लास्टिकचा तांदुळ सापडल्यानं खळबळ

**पालघर (रानेश गायकवाड):** पालघरमध्ये शालेय विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या पोषण आहारातील तांदळात भेसळ असल्याचा धक्कादायक प्रकार उघड झालाय. मोखाडा तालुक्यातील खोडाळा वाकडपाडा येथे ही घटना समोर आली. हा तांदूळ प्लास्टिकचा असून या तांदळामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होणार असल्याचा आरोप झालाय. त्यामुळे या तांदूळ पुरवठा करणाऱ्या ठेकेदारावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी येथील पालकांकडून करण्यात येत आहे.

कोरोनामुळे सध्या शाळेत दिला जाणारा पोषण आहार विद्यार्थ्यांना घरीच वाटप करण्यात येत असून पालघर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहारातील तांदूळात मोठ्या प्रमाणावर भेसळ असल्याच समोर आल आहे . पालघर मधील मोखाडा तालुक्यातील खोडाळा वाकडपाडा येथील विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेला तांदूळ हा पालकांनी पुन्हा शाळेत परत केला आहे. तांदूळ निवडताना आणि गिरणीत टाकल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला.

या तांदळामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची भीती पालकांकडून व्यक्त करण्यात येत आहे . हा भेसळयुक्त तांदूळ पाण्यात टाकल्यास काही वेळाने पाण्यावर तरंगू लागतो . भिजलेला तांदूळ हातात घेतल्यास पूर्णपणे विरघळला जात असून आगी वर ठेवल्यास पेट घेत असून त्याला प्लास्टिक सारखा उग्र वास येतोय .पालघर मधील शाळांना पोषण आहारासाठी वाटप केला जाणारा तांदूळ हा जळगाव येथील तांदूळ गिरणीतून येत असून या ठेकेदारावर शासनाने त्वरित योग्य ती कारवाई करावी अशी मागणी पालक आणि शालेय समिती कडून करण्यात येत आहे .

पोषण आहारात वाटप केला गेलेला तांदूळ हा



मोखाडा पंचायत समिती कार्यालयामार्फत देण्यात आला असून पालकांच्या तक्रारीनंतर हा प्रकार वाटप करणाऱ्या शिक्षक तसेच मुख्याध्यापक यांच्या लक्षात आला . हा तांदूळ प्लास्टिक सदृश्य असा भेसळयुक्त असल्याची कबुली देखील शाळेतील शिक्षकांनी मुख्याध्यापक यांच्याकडून देण्यात आली आहे . त्यामुळे शालेय समितीने दिलेल्या तक्रारीनुसार या तांदळाचे नमुने तपासणीसाठी वरिष्ठ पातळीवर पाठवण्यात आले असून अहवाल सादर झाल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल असे आश्वासन जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून देण्यात आल आहे.

पालघरमध्ये सध्या देण्यात आलेला भेसळयुक्त तांदूळ अनेक शाळांमध्ये समोर येत असून जिल्ह्याला पुरवठा करणाऱ्या या तांदळाच्या ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## पुण्यात कुख्यात गुंडाची हत्या; भरदिवसा कोयत्याने सपासप वार करत संपवलं

**पुणे (अभिजीत येरल्लू)-** एका कुख्यात गुंडाची हत्या करण्यात आली आहे. पुण्यातील दत्तवाडी परिसरात ही हत्या करण्यात आली आहे. हत्या झालेल्या गुंडाचे नाव अक्षय किरतकिर्वे असून त्याच्या नावावर अनेक गुन्ह्यांची नोंद आहे. पूर्ववैमनस्यातून ही हत्या करण्यात आली असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुणे शहरातील दत्तवाडी परिसरात सायंकाळच्या सुमारास अक्षय




किरतकिर्वे याची हत्या करण्यात आली आहे. चौघा जणांच्या टोळक्याने भरदिवसा अक्षय किरतकिर्वे याच्यावर कोयत्याने सपासप वार केले. हत्या केल्यानंतर या चौघांनीही घटनास्थळावरुन पळ काढला.

भरदिवसा पुण्यात झालेल्या या हत्याकांडामुळे एकच खळबळ उडाली आहे. हल्लेखोरांनी केलेल्या या हल्ल्यात गुंड अक्षय किरतकिर्वे हा गंभीर जखमी झाला होता. या संपूर्ण घटनेची माहिती पोलिसांना मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झालं आणि त्याला उपचारासाठी रुग्णालयात नेलं. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. पूर्व वैमनस्यातून ही हत्या केली असावी असा पोलिसांनी प्राथमिक अंदाज वर्तवला आहे. या प्रकरणी दत्तवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत. आरोपींनी आपली दहशत माजवण्यासाठी ही असं कृत्य केलं असावं असाही अंदाज वर्तवण्यात येत आहे.

## व्हेल माशाच्या उलटीची तस्करी करणाऱ्या पाच जणांना अटक

**मुंबई (शकिल शेख)-** व्हेल माशाच्या उलटीची विक्रीसाठी आलेल्या पाच जणांना मालाड आणि अंधेरी येथून वन विभागाने अटक केली. त्या पाच जणांकडून एकूण २७ किलो व्हेल



माशाची उलटी जप्त केली आहे. जप्त केलेल्या उलटीची किंमत २७ कोटी रुपये इतकी आहे.

व्हेल माशाच्या उलटीची तस्करीसाठी काही जण मालाड आणि अंधेरी येथे येणार असल्याची माहिती वन विभागाला मिळाली. त्या माहितीची सत्यता पडताळली. गजेंद्र हिरे, उप वन संरक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली संतोष कंक, वन अधिकारी, देशमुख, आरएफओ शहापूर, वनपाल रवींद्र तवर, नारायण माने, गणेश परहर, रामा भांगरे यांच्या पथकाने तपास सुरू केला. मालाड पूर्व येथे चार जण व्हेल माशाची उलटी विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळताच वन विभागाच्या पथकाने तेथे बनावट ग्राहक पाठवला. तेव्हा त्या चौघांनी शुक्रवारी भेटूया असे सांगितले. त्यानंतर शुक्रवारी ते चौघे मालाड पूर्व परिसरात आले. वन विभागाच्या पथकाने सापळा रचून दिवाकर शेट्टी, किरीट वडवाना, दादाभाऊ घनवट, राजेश मिर्स्तीला ताब्यात घेतले. त्या चौघांकडून ८ किलो व्हेल माशाची उलटी जप्त केली. त्या चौघांना व्हेल माशाच्या उलटीच्या तस्करीतून काही रक्कम मिळणार होती. तर दुसरी कारवाई शनिवारी वन विभागाने अंधेरी परिसरात केली. अंधेरी परिसरात एक जण व्हेल माशाची उलटी विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाली.

## पालघरमध्ये मद्यपी पर्यटकांचा पोलिसांवर हल्ला, बीचवर पोलिसांच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न

**पालघर-** चिंचणी बीचवर मद्यपी पर्यटकांनी पोलिसांवर हल्ला केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पालघर जिल्ह्यात पर्यटनाला बंदी असतानाही समुद्र किनारी धिंगाणा घालणाऱ्या पर्यटकांवर कारवाई करण्यास पोलीस गेले होते. यावेळी आरोपींनी पोलिसांच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न केला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पालघर जिल्ह्यात सध्या पर्यटन स्थळांवर पर्यटकांना बंदी आहे. मात्र रविवारची सुट्टी असल्याने



चिंचणी बीचवर मुंबई येथून काही पर्यटक फिरण्यासाठी गेले होते. हे पर्यटक मद्य प्राशन करुन धिंगाणा घालत असल्याचे पोलिसांना आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी कारवाई करायला सुरुवात केली. यावेळी मद्यपी पर्यटकांनी पोलिसांवरच हल्ला केला. पर्यटकांनी आपली गाडी पोलिसांच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केला, असा आरोप केला जात आहे.

## केंद्राच्या सहकार खात्यामुळे महाराष्ट्रात गंडांतर?; शरद पवारांची पहिली प्रतिक्रिया; म्हणाले...

**मुंबई (विशाल कारंडे)-** केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आलेला असून यावेळी नव्याने सहकार खातंही तयार करण्यात आलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे या खात्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. यासोबत गृहमंत्रीपदाची जबाबदारीही कायम ठेवण्यात आली आहे. दरम्यान अमित शाह यांच्याकडे मंत्रीपद गेल्याने राज्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या अडचणींमध्ये वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या राज्यातील सहकार क्षेत्रामध्ये राष्ट्रवादीचा दबदबा आहे. अशाच अमित शाह यांच्याकडे सहकार खात्याचा कार्यभार देण्यात आल्याने राज्यातील सहकार चळवळीत मत्तेदारी असलेल्या राष्ट्रवादीच्या अडचणी वाढतील अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना यावर प्रतिक्रिया दिली आहे. केंद्राच्या सहकार खात्यामुळे महाराष्ट्रात गंडांतर येण्याच्या चर्चेत तथ्य नाही, असं शरद पवार यांनी स्पष्ट सांगितलं आहे. 'सहकार कायदे बनवण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. त्यानुसार महाराष्ट्राच्या विधानसभेने कायदे केले आहेत. विधानसभेने केलेल्या कायद्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार केंद्र सरकारला नाही. केंद्र सरकार महाराष्ट्रातल्या सहकारी चळवळीवर गंडांतर आणेल या बातम्यांना फारसा अर्थ नाही,' असं शरद पवारांनी म्हटलं आहे. सहकार हा विषय घटनेनुसार राज्य सरकारचा आहे असंही त्यांनी स्पष्ट केलं. 'मल्टीस्टेट बँका हा प्रकार केंद्राच्या अखत्यारीत आहे. त्यामुळे सहकार मंत्रालय



हा नवीन विषय नाही. मी दहा वर्षे कृषी खातं सांभाळत होतो, तेव्हाही हा विषय होता आणि आताही आहे,' असं शरद पवारांनी सागितलं. दुर्दैवाने महाराष्ट्रातील माध्यमांनी या खात्यामुळे राज्यातील सहकार चळवळीवर परिणाम होईल, असं भासवलं आहे. त्यात काही तथ्य नाही, असंही त्यांनी सांगितलं.शरद पवार यांनी यावेळी विधानसभा अध्यक्षपदावरही भाष्य केलं.' आमच्या तीन पक्षांचा निर्णय झाला आहे. विधानसभेचं अध्यक्षपद काँग्रेसकडे होतं आणि ते काँग्रेसकडेच राहणार आहे. त्यामुळे कोणीही काही बोलायचा संबंधच येत नाही. आम्हा तिन्ही पक्षांना काँग्रेसचा अध्यक्ष मान्य आहे. त्या निर्णयावर आम्ही कायम आहोत,' असं शरद पवारांनी सांगितलं.

## एसटीचा प्रवास खासगीकरणाच्या दिशेने

**मुंबई (जसबीरकौर भामरा)- देशातील सर्वात मोठे परिवहन महामंडळ असलेल्या राज्य परिवहनने (एसटी) खासगीकरणाच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. एसटीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत ५०० साध्या गाड्या भाडेतत्त्वावर घेण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे.**

एसटीच्या ताफ्यातील पाच हजारांहून अधिक गाड्यांचे आयुर्मान पूर्ण झाल्याने नव्या गाड्यांची महामंडळाला तातडीची गरज आहे. हजारो कोटी रुपयांचा तोटा आणि कोरोनाकाळात घटलेले उत्पन्न यामुळे नवीन गाड्या घेणे शक्य नाही. यामुळे 'शिवशाही'प्रमाणे चालक, बस खासगी आणि वाहक महामंडळाचा यानुसार गाड्या ताफ्यात दाखल होतील.



एसटी महामंडळाच्या संचालक मंडळाची बैठक गुरुवारी झाली. या बैठकीत वाहतूक खात्याने राज्य परिवहन महामंडळासाठी ५०० साध्या बस भाडेतत्त्वावर घेण्यासाठी निविदा मागविण्याबाबत प्रस्ताव मांडला. चर्चेअंती प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली, असे जनसंपर्क अधिकारी राजन शेलार यांनी सांगितले. महिन्याभरात या बससाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करून तातडीने या बस प्रवासी सेवेत दाखल होतील. खासगी बसचा समावेश होणार असला, तरी एकाही एसटी कामगाराच्या नोकरीवर गदा येणार नाही, असे एसटी महामंडळाने म्हटले आहे. सध्या महामंडळाच्या ताफ्यात १६ हजार ५०० बस आहेत. यात वातानुकूलित, साधी, शयनयान, शयन-बैठे आसन, मिडी यांचा समावेश आहे. राज्य परिवहन महामंडळाला १०० टक्के प्रवासी क्षमतेने प्रवासी वाहतूक करण्याची मुभा राज्य सरकारने दिली आहे. एसटी प्रवासाला आरटी-पीसीआर अहवाल, लसीकरण प्रमाणपत्र याची आवश्यकता नाही. यामुळे काही जिल्ह्यांचा अपवाद वगळता उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये एसटी प्रवासी वाहतुकीस चांगला प्रतिसाद मिळत आहे.

## मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर चाकूच्या धाकाने ट्रक चालकांची लूट, दोन सराईत गुन्हेगार ताब्यात

**पिंपरी चिंचवड (कमलाकर दांगट)-** मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर ट्रक चालकांना चाकूचा धाक दाखवून जबरी चोरी करणारी टोळी जेरबंद करण्यात आली आहे. पुण्यातील मावळ भागात स्थानिक गुन्हे शाखेकडून टोळीतील दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मुंबई पुणे दृतगती महामार्गावर वाहन चालकांना लुटल्याच्या घटना अनेक वेळा समोर येत असतात.

खालापूर येथील एक टोळी चोरीचे गुन्हे करत असल्याची खात्रीशीर माहिती गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे एलसीबीच्या पथकाला मिळाली होती. त्यानंतर खालापूर तालुक्यातील मोरबेवाडी चौक येथे सापळा लावत क्राईम ब्रांचच्या पथकाने गणेश हरिभाऊ वाघमारे आणि संतोष उर्फ मंगल्या वाघमारे या दोघांना ताब्यात घेतले. आरोपी हे सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, चोरी, गंभीर दुखापतीसह



मारामारी असे गुन्हे दाखल आहेत. मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर ट्रक चालकांना थांबवून चाकूचा धाक दाखवत ते जबरी चोरी करत असल्याचा आरोप आहे. दुसरीकडे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत असलेल्या भोसरी, पिंपरी, निगडी, भोसरी एमआयडीसी आणि आळंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गुन्हेगारांवर तडिपारीची कारवाई करण्यात आली आहे. २३ सराईत गुन्हेगारांना एकाच दिवशी तडीपार करण्यात आले. या २३ गुन्हेगारांना पुणे जिल्ह्यातून २ वर्षांसाठी तडीपार करण्यात आले. पोलीस उपायुक्त परिमंडळ एक अंतर्गत असलेल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीतून २०२०-२१ या वर्षामध्ये ९८ सराईत गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले आहे. दुसरीकडे, कोरोना काळात सार्वजनिक ठिकाणी आणि पर्यटन स्थळी गर्दी करु नका, असे वारंवार सांगूनही अनेकजण सर्रासपणे नियमांचे उल्लंघन करत आहेत. अशाच काही अतिउत्साही पर्यटकांना पुणे पोलिसांनी चांगलाच इंगा दाखवला.

## ED कडून सचिन वाझेची आमने-सामने चौकशी

**मुंबई (अलीहूसेन शेख)-** महाराष्ट्राच्या राजकारणात वादळ उठवून देणाऱ्या सचिन वाझे प्रकरणामागे आता सीबीआयनंतर सक्तवसुली संचलनालय हात धूवून मागे लागलं आहे. सलग दोन दिवस कठोर चौकशीनंतर आज ईडी माजी मंत्री अनिल देशमुखयांचे पीए संजीव पलांडे आणि कुंदन शिंदे यांच्या समोरोसमोर चौकशी करणार आहे. विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय आधिवेशनात पहिल्यांदा सचिन वाझे प्रकरणाला वाचा फुटली होती. या वादाचे मुंबईचे तत्कालीन पोलिस आयुक्त परमबीर सिंहपडल्यानंतर प्रकरण थेट हायकोर्टातगेल्यानं गृहमंत्री अनिल देशमुख यांना पायऊतार व्हावे लागले.



सीबीआय पाठोपाठ ईडीने १०० कोटी रुपयांच्या खंडणीप्रकरणाची चौकशीचे फास आवळल्यानंतर माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे पीए सचिव संजीव पलांडे आणि पीए कुंदन शिंदे यांना अटक झाली होती. चौकशीत वाझेनी मुंबईतील ऑर्केस्ट्रा बामालकांकडून ४ कोटी ७० लाख रुपये वसूल करून दोन हप्त्यांमध्ये शिंदे यांच्याकडे दिले होते, अशी कबुली शिंदे आणि पलांडे यांनी दिल्याचा दावा ईडीने केला आहे.. अनिल देशमुख थेट आदेश द्यायचे असंही वाझेनं आपल्या जबाबात म्हटलं होतं. या जबाबानुसार वाझेची चौकशी करायची असल्यानं तुरुंगात जाऊन त्याची चौकशी करण्याची परवानगी मिळावी, असा विनंती अर्ज ईडीने केला होता. तो अर्ज न्यायालयाने मान्य केल्यानंतर कोर्टाच्या नियमाप्रमाणे दोन दिवसाची चौकशी पार पडली आहे. मुंईतील बारमालकांकडून केलेली हप्ता वसुली आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांवर सलग दोन दिवस चौकशी पार पडली आहे. ईडीच्या अटकेत असलेले अनिल देशमुख यांचे पीए संजीव पलांडे व कुंदन शिंदे यांना आज त्याच्यासमोर बसवून विचारणा करण्यात येणार आहे. प्राथमिक अहवालावरून ईडीने मनी लॉड्रिंगचा गुन्हा दाखल केला आहे.

## जालन्यात अवैध गर्भपात आणि लैंगिक शक्तिवर्धक औषधांची विक्री!

**जालना (अकिल शेख):** शहरात लैंगिक शक्तीवर्धक आणि गर्भपातासाठी लागणाऱ्या औषधाची अवैधरित्या विक्री करणाऱ्या करणाऱ्या मेडिकल जनरल स्टोअर वर अन्न व औषध प्रशासनाच्या टीमने धाड टाकून मोठ्या प्रमाणावर गोळ्यांचा साठा जप्त केला आहे. संबंधित मेडिकल चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुना जालना शहरातील रुबी मेडिकल आणि जनरल स्टोअर मधून मोठ्या प्रमाणत लैंगिक शक्तीवर्धक आणि गर्भपातासाठी लागणाऱ्या औषधाची विक्री केल्या जात असल्याच्या अनेक तक्रारी अन्न व औषध प्रशासनास प्राप्त झाल्या होत्या. अन्न व औषध प्रशासनच्या अधिकाऱ्यांनी धाड



टाकून या स्टोअरची तपासणी केली असता या लैंगिक शक्ती वर्धक आणि गर्भपातासाठी लागणाऱ्या औषधाची अवैधरित्या खरेदी करून विक्री केली जात असल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आली. त्यामुळे शहरात चाललेला हा गोरखधंदा समोर आला आहे. या औषधांचे कोणतेही बिल, गोळ्या औषधावर व एमटीपी किटच्या स्ट्रीपवर उत्पादकांचा बॅच क्रमांक, उत्पादन दिनांक, एमआरपी आढळून आल्या नसल्याने रुबी मेडिकल चालक महंमद जावेद यांच्या विरुद्ध औषध निरीक्षक अंजली मिटकर यांच्या तक्रारी वरून रात्री उशिरा कदीम जालना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.